REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 9 | JUNE - 2019

# महात्मा फुले यांच्या साहित्यातील विद्रोह...

डॉ. रीता पाठक
नबीरा महाविद्यालय , काटोल.

**प्रस्तावना :**

मराठी वाङ्मयेतिहासाचे अवलोकन केले असता एक बाब लक्षात येते. ती म्हणजे मराठी वाङ्मयाच्या अभ्यासकांनी, तथाकथित विद्वानांनी म.फुले यांच्या वाङ्मयाला उपेक्षित ठेवण्यातच स्वत:चे मोठेपणे सिद्ध केले. त्यांच्या लेखनावर टीका करून व्यक्तिगत निंदामालस्ती करून अनुल्लेखाने हेटाळणी केली. ब्राह्मणी सौंदर्यमूल्यांचा पगडा असणाऱ्या समीक्षकांनी म.फुले यांचे वाङ्मय साहित्यिक पात्रतेत बसत नाही म्हणून हिणवले आहे. कारण जोतिरावांची रांगडी ओबडधोबड भाषा, ब्राह्मणी वर्चस्ववादी साहित्यावर हल्लाबोल करणारी असल्यामुळे त्यांना ती रुजणे शक्य नव्हते.



मराठी ग्रामीण साहित्यविश्वाचे 'आद्य जनक' ठरणाऱ्या जोतिरावांच्या वाङ्मयीन कर्तृत्वाविषयी प्रचलित शहरी पांढरपेशा आणि उच्चभ्रू इंग्रजाळलेल्या वाङ्मयेतिहासात काही लिहिले गेले नाही. ग्रामीण–नागर, श्रेष्ठ–कनिष्ठ, स्त्री–पुरुष, गरीब–श्रीमंत, स्पृश्य–अस्पृश्य अशा भेदांना छेद देणाऱ्या व निरक्षरांच्या बोलीशी तादात्म्य साधणाऱ्या अस्सल देशी वाङ्मयास आणि खुद्द जोतिरावांस अनुल्लेखाने मारणे अथवा हेटाळणी करणे ही मराठी साहित्य विश्वासातील समीक्षेची परंपरा आजपर्यंत कार्यरत राहिलेली आहे.

म.फुले यांच्या वाङ्मयीन वैशिष्ट्यांचा शोध घेत असताना त्यांच्या साहित्याचा मूळ 'पिंड' वैचारिकता असून 'मान्यता' हे त्यांचे प्राणभूत तत्व असल्याचे प्रामुख्याने दिसून येते. त्यांच्या काळात रुढ असलेली पंडिती आणि संस्कृतप्रचुर व दुर्बोध भाषाशैली जी की अज्ञानी अंगठेबहाद्दर समाजापासून फटकून वागणारी होती. तत्कालीन पंडिती परंपरेत मराठी जननी बोली ाषेची गळचेपी होऊन, संस्कृत भाषेवर आधारीत इंग्रज मिशनऱ्यांच्या प्रभावाने ख्रिस्ताळलेली भाषा मराठी साहित्यातून अद्यापपर्यंत शहरी पांढरपेशी विचारवंत वापरीत होते. थोड्या फार प्रमाणात अधूनमधून फुलेंच्या लेखणीवरही इंग्रजी वळणाच्या रचनापद्धतीचा प्रभाव असल्याचे दिसते. तरीही त्यांची वाङ्मयीन भाषाशैली लयदार, उपरोधिक, उपहासाच्या परिघातून आपले विचारविश्व समृद्ध करताना दिसते.

**विद्रोह :**

'विद्रोह' हा परिवर्तनवादी नवविचार मूल्यांच्या प्रतिष्ठापनेसाठी असतो. एका मूल्य समूहास छेद देऊन त्याठिकाणी दुसरा मूल्यसमूह अस्तित्वात यावा म्हणून विद्रोहाचा अवतार होत असतो. तद्वतच जोतिरावांच्या लेखणीतून विद्रोहाचा जळजळीत अंगार व्यक्त होताना दिसतो. त्यांची गद्य आणि पद्य रचना म्हणजे विद्रोहाचा स्फोट आहे. जुन्या सरंजामशाही, वर्चस्ववादी समाजरचनेचा आणि वेदान्ती मनुमत तत्त्वज्ञानाचा अव्हेर करून समता प्रस्थापित करण्यासाठी 'अखंडातून' विद्रोही मतांची उभारणी केली आहे. आज ज्या काही परिवर्तनवादी चळवळी निर्माण झाल्या त्या सर्वांना जोतिरावांच्या विद्रोही साहित्याचे अधिष्ठान असल्याचे दिसून येते. दलित, ग्रामीण, आदिवासी, जन, स्त्रीवादी आदी साहित्य चळवळी म.फुले यांना आपले प्रेरणास्थान मानतात. जोतिरावांनी वर्ण–जाती विग्रह करण्याचे मौलिक कार्य केले आहे. स्फोटक ज्वालाग्राही शब्दांची योजना करून भट, कुलकर्णी, जती, मारवाडी, खोत, सावकार आदी शोषक घटकांच्या विरोधात शोषित शेतकऱ्यांना संघटित करण्याचे कार्य केले. स्त्रियांना पुरुषी वर्चस्वाविरूद्ध बंड करण्यास सज्ज केले. विषमताधिष्ठित समाजरचनेत बदल घडवून आणण्यासाठी समाजाला मूलगामी व शास्त्रीय दृष्टिकोन प्राप्त करून दिला. ज्या ठिकाणी संताप अनावर झाला.

गुप्तांग व लैंगिक क्रियांचे उल्लेख टाळून विद्रोह व्यक्त केला आहे. तर कोठे परखड मत व्यक्त केले आहे.

"शूद्राघरी पूजा खेळ मांडीभट।
देवा करी + +।। हितासाठी"[१] किंवा (६०९)
"कसबी +++ मुखविटाळ मानीना।।
शूद्र राजांना नीच मानी, घेईना पंक्तींना।।[२] (६१२)

किंवा

"विद्या शिकवूनी मग + + गप्पा।
मनुमत कापा तुम्ही सर्व।।"[३] किंवा (६०४)
"गुदचक्रातून + + चा गजर।। होई वारंवार।। बाजापरी।।[४](६०१)"
आदी ठिकाणी लैंगिक उल्लेख टाळला आहे तर,
"अरे, ज्यांस ओची गांड कशी फोडावी हे मूळींच..."[५] (१८२)

किंवा

"वेश्यांचे चुंबन घेती।। शूद्रा पदोदका देती।।[६](५९८)

वरील ठिकाणी परखड मत मांडताना फुले अत्यंत व्यथित झालेले असावेत. जेणेकरून नाईलाजास्तव जाणिवपूर्वक त्यांना अश्लील शब्दांची रचना करावी लागली आहे. तद्वतच "रेडा जैसा, गौत्यागोमाजी, डोमल्यावर, फुकटचे खाऊन माजलेले कृतघ्न पोळ, हलकट, भीकमाग्या, मारा बोंबा अशी परखड विद्रोही भाषा जाणीवपूर्वक वापरलेली दिसते. म.फुलेंची भाषाही ग्रामीण जीवनातील अज्ञानी समाजाशी जवळीक साधणारी आहे.

जोतिरावांचा 'विद्रोह' प्रामुख्याने धर्मपरंपरा, संस्कृती इत्यादींना पवित्र मानणाऱ्या आणि त्यानिमित्ताने अस्पृश्यांना कायम दास्यत्वात ठेवू पाहणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध बंड करणारा होता. अशा मनुमतवादी ब्राह्मणी विकृत प्रवृत्तींवर आघात करावा, परंपरेतील प्रेमामुळे अगर खोट्या अहंगंडामुळे ही व्यवस्था शाबूत ठेवण्यात अप्रत्यक्ष मदत करणाऱ्या स्वकियांविरुद्ध लढा उभा करावा आणि स्त्री–शूद्रांना पांढरपेशा मनोवृत्तीविरूद्ध उठाव करण्यास भाग पाडावे यासाठी फुल्यांनी जाणीवपूर्वक झोंबणाऱ्या रांगडी व परखड भाषेचा उपयोग केला. "देवा लाभ छातीवर (१०८)" 'तगादे यम दारी बसले (११४)' 'संक्रांती पाडवा भोके' सर्व सणी।। लाज नाहीं मनी' वाटोळ्याच्या (११६)', 'भीकमाग्या', 'मारा बोंबा, 'धुर्त आर्यभट्ट (५९५)', कुभांडी, अभंड (५९२)', धर्मलंड (५९३) व्यर्थ वाचाळता, नीच बेटे (५९५) आदी दाहक व विद्रोहमूलक भाषेचा उपयोग फुल्यांनी बहुजन समाजातील मरगळ घालविण्यासाठी व भटा–ब्राह्मणांना हादरे देण्यासाठी केल्याचा दिसून येतो. स.गं. मालशे म्हणतात, त्याप्रमाणे "त्यांच्या लेखनात विध्वंसकतेबरोबर विधायकता अवश्य आहे."[७] त्यांचे व्यक्तित्व जसे परखड आणि संतप्त आहे तसेच त्यांचे गद्य आणि पद्यलेखन संतप्त आणि परखड असल्याचा अनुभव येतो.

## संदर्भ ग्रंथ सूची:


१. धनंजय की, स.गं. मालशे, डॉ. य.दि. फडके, महात्मा फुले समग्र वाङ्मय, अखंड, महारा ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, सुधा.६ वी आवृत्ती नोव्हेंबर, २००६, पृ.क्र. ६०९
२. कित्ता, पृ.क्र. ६१२
३. कित्ता, पृ.क्र. ६०४
४. कित्ता, पृ.क्र. ६०१
५. कित्ता, गुलामगिरी पृ.क्र. १८२
६. कित्ता, अखंड, पृ.क्र. ५९८